सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**

दूरध्वनी क्र.०२२-२२०२३१६१
Email ID : dgipr-aasthapana@mah.gov.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला,
मंत्रालयासमोर, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०००३२

क्र:प्रविस्था-०२(२०२४)/परिपत्रक/नि.बदली-२०२४/का-१/ ३४४ दिनांक : 16 FEB 2025

संदर्भ :
१) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५, शासन अधिसूचना दि.२५.५.२००६
२) शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्या.१२, दि.०९.४.२०१८
३) शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५०९/कार्या.१२, दि.१५.५.२०१९
४) शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०२२/प्र.क्र.४२/कार्या.१२, दि.२८.१२.२०२२

## परिपत्रक

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय व अधिनस्त कार्यालयातील सर्व कर्मचारी यांच्या नियतकालिक बदल्यांबाबत, शासन अधिसूचना दिनांक २५.५.२००६ नुसार बदल्यांचे विनियमन विषयक अधिनियम २००५ अन्वये नियतकालिक बदल्यांची कार्यवाही **एप्रिल/मे, २०२५** मध्ये करण्यात येतात. तसेच संदर्भ क्र.३ व ४ अन्वये शासन निर्णयातील सूचनेच्या अनुषंगाने कर्मचारी यांची कायमस्वरुपी समावेशन करण्याबाबत बदल्यांची प्रकरणे देखील विचारात घ्यावयाची आहेत. त्याप्रमाणे संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये गट-क मधील कर्मचारी यांना समुपदेशनाद्वारे बदलीचे धोरण लागू आहे.

शासन अधिसूचना दिनांक २५.५.२००६ नुसार बदल्यांचे विनियमन विषयक अधिनियम २००५ मधील प्रकरण दोन, कलम ३(१) अखिल भारतीय सेवेतील अधिकारी आणि अ, ब आणि क गटातील राज्य शासनाचे सर्व सेवक यांच्याकरिता एखाद्या पदावर असण्याचा सामान्य कालावधी तीन वर्षाचा असेल : परंतु असा कर्मचारी हा, गट-क मधील बिगर-सेक्रेटरिएट सेवेतील कमचारी असेल तर, अशा कर्मचाऱ्याने धारण केलेल्या पदावर दोन पूर्ण पदावधींची सेवा पूर्ण केल्यानंतर त्याची त्या कार्यालयातून किंवा विभागातून दुसऱ्या कार्यालयात किंवा विभागात बदली करण्यात येईल:

**प्रकरण दोन, कलम ३ (२)** गट-ड मधील कर्मचाऱ्यांसाठी सामान्यपणे पदावधी निश्चित केला जाणार नाही. ते ज्या ठिकाणी काम करीत असतील त्या ठिकाणच्या बाहेर ज्या ठिकाणी त्यांनी बदली करण्याची विनंती केली असेल तेथे निर्बाध रिक्त पद असल्याखेरीज किंवा परस्पर संमतीने बदली मागितली असल्याखेरीज किंवा त्यांच्याविरुद्ध गंभीर स्वरुपाची साधार तक्रार आली असल्याखेरीज ज्यांची त्या ठिकाणाहून अन्यत्र बदली केली जाणार नाही.

**प्रकरण दोन, कलम ४ (१)** सामान्यपणे, कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याने कलम ३ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्याच्या नेमणुकीचा पदावधी पूर्ण केला असल्याखेरीज त्यांची बदली करण्यात येणार नाही. ४ (२) सक्षम प्राधिकारी प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्यात, त्या वर्षी एप्रिल व मे महिन्यात बदलीसाठी पात्र होतील अशा शासकीय कर्मचाऱ्यांची यादी तयार करील, असे अधिसूचनेत निर्देश आहेत.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय व अधिनस्त कार्यालयातील गट-क मधील कर्मचाऱ्यांना एका विभागामधून दुसऱ्या विभागामध्ये कायमस्वरुपी समावेशनाद्वारे विभाग बदलून जायचे असल्यास शासकीय कर्मचाऱ्यांच्या विनंतीनुसार संवर्गाअंतर्गत एका नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या आस्थापनेवरुन दुसऱ्या नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी समावेशन करण्याबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. संबंधित कर्मचाऱ्यांनी संदर्भाधीन-३ मधील कायमस्वरुपी समावेशनाच्या अटी व शर्तीनुसार "परिशिष्ट-एक" ते "चार" चे अवलोकन करुन नियुक्ती प्राधिकारी यांच्याकडे विहित मार्गाने संबंधित प्रादेशिक प्रमुखांकडे अर्ज पाठवावेत. संदर्भाधीन-३ व ४ च्या शासन निर्णयामधील तरतुदीची खात्री करुन

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र.०२२-२२०२३१६१
Email ID : dgipr-aasthapana@mah.gov.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला,
मंत्रालयासमोर, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०००३२

प्रादेशिक प्रमुखांनी पुढील योग्य ती कार्यवाही नियमानुसार करुन अभिप्रायासह मुख्यालय मुंबई येथे अंतिम मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावेत.

महासंचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या विभागस्तरावरील कार्यालयातील वर्ग-३ व वर्ग- ४ च्या कर्मचाऱ्यांच्या नियतकालिक बदल्या, संदर्भ क्र.१ च्या अधिसूचने अन्वये आणि विभागांतर्गत कायमस्वरुपी समावेशनाद्वारे संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयान्वये, प्रादेशिक कार्यालय प्रमुख आणि कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्यास्तरावरुन बदल्यांबाबतची आवश्यक ती कार्यवाही करावी व तसा अहवाल महासंचालनालयास तत्काळ सादर करावा.

सदरचे परिपत्रक महासंचालनालयाच्या www.dgipr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

(हेमराज बागूल)
संचालक (माहिती)(प्रशासन)

प्रति,

१. सर्व संबंधित कर्मचारी.
२. सर्व अधिनस्त कार्यालये.

**प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. संचालक,(माहिती)(वृत्त व जनसंपर्क),माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
३. संचालक,(माहिती), माहिती व जनसंपर्क, नागपूर-अमरावती विभाग,नागपूर
४. संचालक (माहिती), माहिती व जनसंपर्क, मराठवाडा विभाग, संभाजीनगर
५. उपसंचालक (माहिती/प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
६. उपसंचालक (वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई.
७. उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
८. उपसंचालक (प्रदर्शने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
९. उपसंचालक (माहिती) महाराष्ट्र परिचय केंद्र,नवी दिल्ली.
१०. उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
११. उपसंचालक (माहिती),विभागीय माहिती कार्यालय,कोकण/नाशिक/पुणे/कोल्हापूर/अमरावती/लातूर
१२. वरिष्ठ सहायक संचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, पणजी-गोवा.
१३. वरिष्ठ सहायक संचालक (वृत्तचित्र शाखा) (प्रकाशने शाखा) (विभागीय संपर्क कक्ष) (महान्यूज)
१४. वरिष्ठ सहायक संचालक (आस्थापना) / (जाहिरात-प्रशासन)
१५. संशोधन अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१६. सर्व जिल्हा माहिती अधिकारी (माहिती केंद्रासह)
१७. माहिती अधिकारी, उप माहिती कार्यालय, डहाणू/शिर्डी
१८. अधिपरिक्षक, पुस्तके व प्रकाशने, मुंबई
१९. सर्व कार्यासन प्रमुख, (तांत्रिक कक्षासह), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई

**प्रत अग्रेषित :** १. मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय,मुंबई-३२
२. उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग (मावज-२), मंत्रालय, मुंबई-३२